भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# न्यायालय अवमान अधिनियम, १९७१

(१९७१ चा अधिनियम क्रमांक ७०)

[१ जुलै १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Contempt of Courts Act, 1971

(Act No. 70 of 1971)

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९८१)

[किंमत ८० पैसे]

## विशोधन अधिनियमांची सूची

१. न्यायालय अवमान (विशोधन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ४५)

# न्यायालय अवमान अधिनियम, १९७१

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अनभिज्ञतेने एखादे साहित्य प्रकाशित करण्यामुळे व त्याचे वितरण करण्यामुळे अवमान होत नाही.

४. न्यायिक कार्यवाहीचे प्रामाणिक व बिनचूक प्रतिवृत्त हा अवमान नव्हे.

५. न्यायिक कृत्याबद्दल रास्त टीका हा अवमान नव्हे.

६. दुय्यम न्यायालयांच्या पीठासीन अधिकाऱ्यांविरुद्ध केलेली तक्रार हा अवमान केव्हा ठरणार नाही.

७. विवक्षित प्रकरणे खेरीजकरून कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे चाललेल्या कार्यवाहीविषयीची माहिती प्रकाशित करणे हा अवमान नव्हे.

८. इतर बचावांना बाध न येणे.

९. अवमानाच्या कक्षेचा विस्तार अधिनियमावरून उपलक्षित न होणे.

१०. दुय्यम न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा देण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

११. अधिकारिताक्षेत्राबाहेर केलेल्या अपराधांची किंवा तेथे सापडलेल्या अपराध्यांची संपरीक्षा करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

१२. न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा.

१३. विवक्षित प्रकरणीं अवमान शिक्षापात्र नाही.

१४. अवमान सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा एखाद्या उच्च न्यायालयाच्या देखत केला गेला असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१५. इतर प्रकरणांत फौजदारीपात्र अवमानाची दखल.

१६. न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायिक कार्य करणाऱ्या इतर व्यक्तीने केलेला अवमान.

१७. दखल घेतल्यानंतरची कार्यपद्धती.

१८. फौजदारीपात्र अवमानांच्या प्रकरणांची सुनावणी न्यायपीठांनी करणे.

१९. अपिले.

२०. अवमानाबद्दल कारवाई करण्याची मुदतमर्यादा.

२१. न्याय पंचायती किंवा इतर ग्राम न्यायालये यांना हा अधिनियम लागू नसणे.

२२. हा अधिनियम अवमानाशी संबंधित अशा अन्य कायद्यांच्या व्यतिरिक्त आहे, त्यांस न्यूनकारी नाही.

२३. सर्वोच्च न्यायालयाची व उच्च न्यायालयांची नियम करण्याची शक्ती.

२४. निरसन.

# न्यायालय अवमान अधिनियम, १९७१

**(१९७१ चा अधिनियम क्रमांक ७०)**

[ २४ डिसेंबर, १९७१ ]

**न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा देण्याविषयीच्या विवक्षित न्यायालयांच्या शक्ती निश्चित करून त्यांच्या मर्यादा ठरवून देण्यासाठी व त्यासंबंधातील त्यांच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या बाविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:—

**१.** (१) या अधिनियमास 'न्यायालय अवमान अधिनियम, १९७१' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे:

परंतु, या अधिनियमाच्या उपबंधांचा संबंध सर्वोच्च न्यायालयाच्या अवमानाशी पोचतो तेवढी मर्यादा खेरीजकरून, हा अधिनियम जम्मू व काश्मीर राज्यास लागू होणार नाही.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "न्यायालयाचा अवमान" याचा अर्थ, दिवाणीपात्र अवमान किंवा फौजदारीपात्र अवमान असा आहे ;

(ख) "दिवाणीपात्र अवमान" याचा अर्थ, एखाद्या न्यायालयाचा एखादा न्यायनिर्णय, हुकूमनामा, निदेश, आदेश, प्राधिलेख किंवा इतर आदेशिका यांची जाणूनबुजून अवज्ञा करणे किंवा न्यायालयास दिलेल्या एखाद्या अभिवचनाचा जाणूनबुजून भंग करणे असा आहे ;

(ग) "फौजदारीपात्र अवमान" याचा अर्थ,—

(एक) ज्यामुळे कोणत्याही न्यायालयाचा बदलौकिक होईल किंवा बदलौकिक करण्याकडे ज्याचा रोख असेल अथवा जो त्या न्यायालयाच्या अधिकारास कमीपणा आणील किंवा न्यायालयाच्या अधिकारास कमीपणा आणण्याकडे ज्याचा रोख असेल; किंवा

(दोन) ज्यामुळे कोणत्याही न्यायिक कार्यवाहीच्या रीतसर क्रमास बाध येईल किंवा त्यात हस्तक्षेप होईल किंवा त्यात हस्तक्षेप करण्याकडे ज्याचा रोख असेल; किंवा

(तीन) ज्यामुळे न्यायदानाच्या कामात इतर कोणत्याही पद्धतीने हस्तक्षेप होईल किंवा त्यात हस्तक्षेप करण्याकडे ज्याचा रोख असेल, किंवा त्या कामाला अटकाव होईल किंवा त्यास अटकाव करण्याकडे ज्याचा रोख असेल,

असे कोणतेही साहित्य प्रकाशित करणे (मग ते बोललेल्या किंवा लिखित शब्दांद्वारे असो, हावभावांद्वारे असो, दृश्य प्रतिरूपणांद्वारे असो की इतर कोणत्याही प्रकारे असो) किंवा अशी अन्य कोणतीही कृती करणे असा आहे;

(घ) "उच्च न्यायालय" याचा अर्थ, एखाद्या राज्याचे किंवा संघ राज्यक्षेत्राचे उच्च न्यायालय असा आहे, व त्यात कोणत्याही संघ राज्यक्षेत्रातील न्याय आयुक्ताच्या न्यायालयाचा समावेश होतो.

**३.** (१) एखाद्या व्यक्तीने काही साहित्य प्रकाशित केले असून (मग ते बोललेल्या किंवा लिखित शब्दांद्वारे असो, हावभावांद्वारे असो, दृश्य प्रतिरूपणांद्वारे असो की इतर कोणत्याही प्रकारे असो), एखाद्या दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीच्या संबंधातील न्यायक्रमात त्यामुळे हस्तक्षेप होत असेल किंवा त्यात हस्तक्षेप करण्याकडे त्याचा रोख असेल अथवा त्यामुळे त्यास अटकाव होत असेल किंवा त्यास अटकाव करण्याकडे त्याचा रोख असेल व असे साहित्य प्रकाशित करतेवेळी, ती दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाही न्यायालयाकडे प्रलंबित आहे असे समजण्यास तिला वाजवी कारण नसेल तर, तिने असे साहित्य प्रकाशित केले या कारणावरून ती व्यक्ती न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही. **अनभिज्ञतेने एखादे साहित्य प्रकाशित करण्यामुळे व त्याचे वितरण करण्यामुळे अवमान होत नाही.**

(२) या अधिनियमात किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही विरुद्ध असले तरी, कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीच्या संबंधात पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले असे साहित्य प्रकाशित करण्यात आल्यास व तसे प्रकाशित करण्याच्या वेळी ती कार्यवाही कोणत्याही न्यायालयापुढे प्रलंबित नसल्यास, असे साहित्य प्रकाशित करण्यामुळे न्यायालयाचा अवमान झाला असे मानले जाणार नाही.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले असे कोणतेही साहित्य ज्यात समाविष्ट असेल असे प्रकाशन वितरित करण्यात आले असेल व वितरणाच्या वेळी त्या प्रकाशनात उपरोक्तप्रमाणे मजकूर आहे किंवा असण्याची शक्यता आहे असे समजण्यास वितरण करणाऱ्या व्यक्तीजवळ कोणतेही सयुक्तिक कारण नसेल तर, ती अशा वितरणामुळे न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही :

परंतु, हे पोटकलम पुढील प्रकारच्या प्रकाशनांच्या वितरणाच्या बाबतीत लागू असणार नाही :—

(एक) 'मुद्रण व पुस्तक-नोंदणी अधिनियम, १८६७' (१८६७ चा २५) याच्या कलम ३ मधील नियमांना अनुसरून नव्हे तर अन्यथा छापलेले किंवा प्रकाशित केलेले पुस्तक किंवा कालिक या स्वरूपातील कोणतेही प्रकाशन;

(दोन) उक्त अधिनियमाच्या कलम ५ मधील नियमांना अनुसरून नव्हे तर अन्यथा प्रकाशित केलेल्या एखाद्या वर्तमानपत्राच्या स्वरूपातील कोणतेही प्रकाशन.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ एखादी न्यायिक कार्यवाही ही—

(क्) (क) दिवाणी कार्यवाही असेल त्या बाबतीत, वादपत्र दाखल करून किंवा अन्यथा ती सुरू करण्यात आली असेल तेव्हा,

(ख) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) किंवा इतर कोणताही कायदा याखालील फौजदारी कार्यवाही असेल त्या बाबतीत,—

(एक) अपराध करण्याशी त्या कार्यवाहीचा संबंध असेल तर दोषारोपपत्र किंवा चालान दाखल करण्यात आले असेल तेव्हा, किंवा न्यायालयाने आरोपीविरुद्ध समन्स किंवा, प्रकरणपरत्वे, वॉरंट काढले असेल तेव्हा, आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, त्या कार्यवाहीचा संबंध ज्या गोष्टीशी असेल तिची न्यायालय दखल घेईल तेव्हा,

ती कार्यवाही प्रलंबित आहे असे म्हटले जाईल आणि दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीच्या बाबतीत, त्या कार्यवाहीची सुनावणी होऊन तिचा अंतिम निर्णय लागेपर्यंत म्हणजे ज्या बाबतीत अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करणे हे विधिसंमत असेल त्याबाबतीत, अपिलाची किंवा पुनरीक्षण कार्यवाहीची सुनावणी होऊन त्याचा अंतिम निर्णय लागेपर्यंत अथवा अपील किंवा पुनरीक्षण कार्यवाही दाखल केलेली नसल्यास, अशा अपिलाकरता किंवा पुनरीक्षणाकरता विहित केलेली मुदतमर्यादा समाप्त होईपर्यंत ती कार्यवाही प्रलंबित असण्याचे चालू आहे असे मानण्यात येईल;

(ख्) तिची सुनावणी होऊन अंतिम निर्णय लागला असेल तर त्या कार्यवाहीत दिलेला हुकूमनामा, आदेश किंवा शिक्षादेश यांची अंमलबजावणी प्रलंबित आहे एवढ्याच कारणावरून प्रलंबित आहे असे मानण्यात येणार नाही.

न्यायिक कार्यवाहीचे प्रामाणिक व बिनचूक प्रतिवृत्त हा अवमान नव्हे.

४. कलम ७ मधील उपबंधांच्या अधीनतेने, न्यायिक कार्यवाहीचे किंवा तिच्या कोणत्याही टप्प्या-संबंधीचे सरळ व यथार्थ प्रतिवृत्त प्रकाशित केल्यामुळे कोणतीही व्यक्ती न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही.

न्यायिक कृत्याबद्दल रास्त टीका हा अवमान नव्हे.

५. ज्या प्रकरणाची सुनावणी होऊन त्याचा अंतिम निकाल दिला गेला असेल अशा कोणत्याही प्रकरणाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही रास्त टीकाटिप्पणी प्रकाशित केल्यामुळे कोणतीही व्यक्ती न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही.

दुय्यम न्यायालयांच्या पीठासीन अधिकाऱ्यां-विरुद्ध केलेली तक्रार हा अवमान केव्हा ठरणार नाही.

६. कोणत्याही दुय्यम न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याच्या संबंधात, ते न्यायालय ज्यास दुय्यम असेल अशा—

(क्) दुसऱ्या दुय्यम न्यायालयापुढे, किंवा

(ख्) उच्च न्यायालयापुढे,

एखाद्या व्यक्तीने सद्भावपूर्वक एखादे विधान केले असेल तर, ती व्यक्ती त्यामुळे न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "दुय्यम न्यायालय" याचा अर्थ, एखाद्या उच्च न्यायालयाला दुय्यम असलेले कोणतेही न्यायालय असा होतो.

विवक्षित प्रकरणे खेरीजकरून कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे चाललेल्या कार्यवाही-विषयीची माहिती प्रकाशित करणे हा अवमान नव्हे.

७. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पुढे नमूद केलेली प्रकरणे वगळता एरव्ही, कोणत्याही न्यायालयासमोर कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे चाललेल्या न्यायिक कार्यवाहीचे प्रामाणिक व बिनचूक प्रतिवृत्त प्रकाशित करण्यामुळे कोणतीही व्यक्ती न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही, ती प्रकरणे म्हणजे :—

(क्) असे प्रकाशन हे त्या त्या काळी अंमलात असलेल्या एखाद्या अधिनियमितीच्या उप-बंधांच्या विरुद्ध असेल त्या बाबतीत;

(ख्) ज्या कार्यवाहीशी संबंधित अशी सर्व माहिती किंवा ज्या प्रकारची माहिती प्रकाशित झाली असेल त्या प्रकारची माहिती प्रकाशित करण्यास न्यायालयाने लोकधोरणाच्या कारणांवरून किंवा आपल्या ठायी निहित असलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून व्यक्तपणे मनाई केली असेल त्या बाबतीत;

(ग्) ज्यावेळी सार्वजनिक सुव्यवस्थेशी किंवा देशाच्या सुरक्षिततेशी निगडित असणाऱ्या कारणांस्तव न्यायालय कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे बसून काम चालवत असेल त्या बाबतीत, त्या कार्यवाहीसंबंधीची माहिती प्रकाशित करणे;

(घ) ज्यावेळी अशी माहिती ही कार्यवाहीचा विषय असणाऱ्या एखाद्या गुप्त प्रक्रियेशी; शोधाशी किंवा कल्पकशोधाशी संबंधित असेल त्याबाबतीत.

(२) पोटकलम (१) मधील उपबंधांस बाध न येता, एखादी व्यक्ती न्यायालयाने कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे काम चालवून दिलेल्या संपूर्ण आदेशाचा किंवा त्याच्या एखाद्या भागाचा मजकूर अथवा त्याचा सरळ व यथार्थ सारांश प्रकाशित केल्यामुळे न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरणार नाही,––मात्र, न्यायालयाने लोकधोरणाच्या कारणांवरून, किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेशी किंवा देशाच्या सुरक्षिततेशी निगडित अशा कारणांस्तव किंवा त्या मजकुरामध्ये एखाद्या गुप्त प्रक्रियेची किंवा शोधाची किंवा कल्पकशोधाची माहिती समाविष्ट आहे या कारणावरून, किंवा आपल्या ठायी निहित असलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून न्यायालयाने त्याच्या प्रकाशनास व्यक्तपणे मनाई केलेली असेल तर गोष्ट अलाहिदा.

इतर बचावांना बाध न येणे.

८. न्यायालयाच्या अवमानाविषयीच्या कोणत्याही कार्यवाहीत विधिग्राह्य ठरला असता असा इतर कोणताही बचाव केवळ या अधिनियमाच्या उपबंधांमुळे उपलब्ध होण्याचे बंद झाले आहे, असे या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीवरून उपलक्षित होते असा तिचा अर्थ लावण्यात येणार नाही.

अवमानाच्या कक्षेचा विस्तार अधिनियमावरून उपलक्षित न होणे.

९. जी अवज्ञा, भंग, प्रकाशन किंवा इतर कृत्य या अधिनियमाव्यतिरिक्त एरव्ही न्यायालयाचा अवमान म्हणून शिक्षापात्र ठरले नसते ते कृत्य शिक्षापात्र आहे असे या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीवरून उपलक्षित होते असा तिचा अर्थ लावण्यात येणार नाही.

दुय्यम न्यायालयांच्या अवमानाबद्दल शिक्षा देण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

१०. प्रत्येक उच्च न्यायालयाला आपल्या स्वतःच्या अवमानाच्या बाबतीत जी अधिकारिता, शक्ती व प्राधिकार आहेत तीच अधिकारिता, शक्ती व प्राधिकार त्याला आपल्या दुय्यम न्यायालयांच्या अवमानाच्या बाबतीतही असतील व उच्च न्यायालय त्यांचा एरव्ही ज्याप्रमाणे वापर करते त्याच प्रक्रियेनुसार व शिरस्त्याने ते या बाबतीत त्यांचा वापर करील:

परंतु, दुय्यम न्यायालयाचा असा अवमान हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यानुसार शिक्षापात्र अपराध असेल त्याबाबतीत, कोणतेही उच्च न्यायालय आपल्या दुय्यम न्यायालयाच्या संबंधात जो अवमान केल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्याची दखल घेणार नाही.

अधिकारिताक्षेत्राबाहेर केलेल्या अपराधांची किंवा तेथे सापडलेल्या अपराध्यांची संपरीक्षा करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

११. उच्च न्यायालयास, आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या कोणत्याही दुय्यम न्यायालयाच्या अवमानाची चौकशी किंवा संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल,––मग असा अवमान त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये केला असल्याचे अभिकथित असो किंवा बाहेर केला असल्याचे अभिकथित असो, आणि अशा अवमानाबद्दल दोषी असल्याचे अभिकथन करण्यात आलेली व्यक्ती ही अशा सीमांमध्ये असो किंवा बाहेर असो.

न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा.

१२. (१) या अधिनियमात किंवा इतर कोणत्याही कायद्यात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, न्यायालयाच्या अवमानाबद्दल सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा साधा कारावास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड किंवा या दोन्ही शिक्षा देता येतील :

परंतु, न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने क्षमायाचना करण्यात आल्यास, आरोपीस विनादोषारोप सोडून देता येईल किंवा त्यास दिलेली शिक्षा माफ करता येईल.

**स्पष्टीकरण.**––आरोपीने सद्भावपूर्वक क्षमायाचना केली असेल तर, ती सापेक्ष किंवा सशर्त आहे या कारणावरून नाकारली जाणार नाही.

(२) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही न्यायालय आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या कोणत्याही दुय्यम न्यायालयाच्या अवमानाबद्दल पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा ठोठावणार नाही.

(३) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी व्यक्ती दिवाणीपात्र अवमानाबद्दल दोषी ठरली असेल त्याबाबतीत, जर द्रव्यदंडाने न्यायाचे अंतिम उद्दिष्ट साध्य होणार नाही व कारावासाची शिक्षा देणे आवश्यक आहे असे न्यायालयाला वाटले तर, त्या व्यक्तीस साध्या कारावासाचा शिक्षादेश देण्याऐवजी ते न्यायालय आपणास योग्य वाटेल तितक्या व जास्तीत जास्त सहा महिने इतक्या मुदतीपर्यंत त्या व्यक्तीस दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून ठेवावे असा निदेश देईल.

(४) न्यायालयास दिलेल्या कोणत्याही अभिवचनाच्या संबंधात न्यायालयाच्या अवमानाबद्दल दोषी ठरलेली व्यक्ती ही एखादी कंपनी असेल त्याबाबतीत, अवमान घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाची प्रभारी होती किंवा त्याबद्दल कंपनीला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती, तसेच ती

कंपनीदेखील त्या अवमानाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि न्यायालयाच्या अनुमतीने, अशा प्रत्येक व्यक्तीस दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून शिक्षा अंमलात आणता येईल :

परंतु, अवमान आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती अशा शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(५) पोटकलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा त्यात उल्लेखिलेला न्यायालयाचा अवमान एखाद्या कंपनीने केलेला असेल व कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने अवमान करण्यात आला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अवमानाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात येईल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हादेखील त्या अवमानाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि न्यायालयाच्या अनुमतीने, अशा संचालकास, व्यवस्थापकास, सचिवास किंवा इतर अधिकाऱ्यास दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून शिक्षा अंमलात आणता येईल.

**स्पष्टीकरण.**—पोटकलमे (४) व (५) यांच्या प्रयोजनार्थ—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय असा आहे व त्यात पेढी किंवा इतर व्यक्तिसंघ यांचा समावेश होतो; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

विवक्षित प्रकरणीं अवमान शिक्षापात्र नाही.

**१३.** त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयाचा अवमान अशा स्वरूपाचा आहे की, त्यामुळे न्यायदानाच्या रीतसर क्रमात भरीव प्रमाणात हस्तक्षेप होतो किंवा त्यात भरीव प्रमाणात हस्तक्षेप करण्याकडे त्याचा रोख आहे, अशी स्वतःची खात्री पटल्याशिवाय कोणतेही न्यायालय न्यायालयाच्या अवमानाबद्दल या अधिनियमाखाली शिक्षा ठोठावणार नाही.

अवमान सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा एखाद्या उच्च न्यायालयाच्या देखत केला गेला असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

**१४.** (१) सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या देखत किंवा त्याला ऐकू येईल अशा तऱ्हेने अवमान केल्याबद्दल एखादी व्यक्ती दोषी आहे असे अभिकथन करण्यात आले असेल, किंवा तसे सर्वोच्च न्यायालयाला अगर उच्च न्यायालयाला आपल्या दृष्टीने वाटत असेल त्याबाबतीत, ते न्यायालय अशा व्यक्तीला हवालतीत स्थानबद्ध करवू शकेल, आणि न्यायालय उठण्यापूर्वी त्याच दिवशी, किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, न्यायालय—

(क) त्या व्यक्तीस तिच्यावर ज्याचा दोषारोप ठेवला आहे त्या अवमानाविषयी लेखी माहिती देववील;

(ख) तिला त्या दोषारोपाच्या बाबतीत आपला बचाव करण्याची संधी देईल;

(ग) आवश्यक असेल असा किंवा अशा व्यक्तीकडून देण्यात येईल असा पुरावा घेतल्यानंतर व अशा व्यक्तीचें म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, एकतर लगेच किंवा तहकुबीनंतर दोषारोपाच्या बाबीचा निकाल करण्याच्या कामास सुरुवात करील; आणि

(घ) न्याय्य असेल त्याप्रमाणे अशा व्यक्तीस शिक्षा देण्याचा किंवा तिला विनादोषारोप सोडून देण्याचा आदेश देईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या पोटकलमाखाली जिच्यावर अवमान केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला आहे त्या व्यक्तीने जर असा लेखी किंवा तोंडी अर्ज केला की, ज्या न्यायाधीशाच्या किंवा न्यायाधीशांच्या देखत किंवा ज्याला/ज्यांना ऐकू येईल अशा तऱ्हेने तिने असा अपराध केला असल्याचे अभिकथन करण्यात आले आहे त्याहून अन्य एखाद्या न्यायाधीशाने तिच्यावरील दोषारोपांची संपरीक्षा करावी, आणि असे करणे व्यवहार्य आहे व उचित न्यायदानाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करावा असे त्या न्यायालयाचे मत असेल तर, ते न्यायालय ती बाब त्या प्रकरणातील तथ्यांच्या निवेदनासह मुख्य न्यायमूर्तीपुढे, त्याने त्या बाबीच्या संपरीक्षेबाबत त्यास योग्य वाटतील असे निदेश द्यावेत यासाठी ठेववील.

(३) इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) खाली जिच्यावर अवमान केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला आहे त्या व्यक्तीची पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या निदेशानुसार ज्या न्यायाधीशाच्या किंवा न्यायाधीशांच्या देखत किंवा ज्याला/ज्यांना ऐकू येईल अशा तऱ्हेने तिने असा अपराध केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्याहून अन्य एखाद्या न्यायाधीशाद्वारे जी संपरीक्षा करण्यात येत असेल अशा कोणत्याही संपरीक्षेमध्ये ज्या न्यायाधीशाच्या किंवा न्यायाधीशांच्या देखत किंवा ज्याला/ज्यांना ऐकू येईल अशा तऱ्हेने तिने असा अपराध केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी साक्षीदार म्हणून हजर राहण्याची आवश्यकता असणार नाही आणि पोटकलम (२) खाली मुख्य न्यायमूर्तीपुढे ठेवण्यात आलेले निवेदन त्या प्रकरणात पुरावा म्हणून समजण्यात येईल.

(४) दोषारोपासंबंधी निकाल होईपर्यंत, या कलमाखाली जिच्यावर अवमान केल्याचा दोषारोप ठेवण्यात आला असेल त्या व्यक्तीस न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा हवालतीत स्थानबद्ध करून ठेवण्यात यावे असा निदेश न्यायालय देऊ शकेल :

परंतु, ज्या बंधपत्रात, दोषारोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीने बंधपत्रात नमूद करण्यात आलेल्या अशा वेळी व ठिकाणी हजर राहिले पाहिजे व न्यायालय अन्य निदेश देईपर्यंत त्याप्रमाणे हजर राहण्याचे चालू ठेवले पाहिजे अशी शर्त घातलेली आहे असे, न्यायालयास पुरेशी वाटेल इतक्या रकमेचे बंधपत्र जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना निष्पादित करून दिल्यास, त्या व्यक्तीला जामिनावर सोडण्यात येईल :

परंतु आणखी असे की, न्यायालयाला योग्य वाटल्यास, अशा व्यक्तीकडून जामीन घेण्याऐवजी तिला ते, तिने उपरोक्ताप्रमाणे हजर राहण्याविषयी जामीनदारांविना बंधपत्र निष्पादित करून दिल्यावर विनादोषारोप सोडून देऊ शकेल.

**१५.** (१) कलम १४ मध्ये उल्लेख केलेल्या अवमानापेक्षा वेगळ्या अशा फौजदारीपात्र अवमानाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाला किंवा उच्च न्यायालयाला, एकतर स्वतः होऊन किंवा—— इतर प्रकरणांत फौजदारीपात्र अवमानाची दखल.

(क्) महा अधिवक्त्याने; किंवा

(ख्) महा अधिवक्त्याच्या लेखी संमतीने, इतर कोणत्याही व्यक्तीने [१] [, किंवा]

[१][ (ग्) दिल्ली या संघ राज्यक्षेत्राच्या उच्च न्यायालयाच्या बाबतीत, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा विधि अधिकाऱ्याने, किंवा अशा विधि अधिकाऱ्याची लेखी संमती घेऊन इतर कोणत्याही व्यक्तीने]

केलेल्या चालना-अर्जावरून कारवाई करता येईल.

(२) एखाद्या दुय्यम न्यायालयाच्या कोणत्याही फौजदारीपात्र अवमानाच्या बाबतीत उच्च न्यायालयास, त्या दुय्यम न्यायालयाकडून त्याच्याकडे पाठवण्यात आलेल्या निर्देशनानुसार अथवा महा अधिवक्त्याने किंवा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा विधि अधिकाऱ्याने केलेल्या चालना-अर्जावरून कारवाई करता येईल.

(३) या कलमाखाली देण्यात आलेल्या प्रत्येक चालना-अर्जात किंवा निर्देशनात, दोषारोप ठेवण्यात आलेली व्यक्ती ज्याबद्दल दोषी असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तो अवमान विनिर्दिष्ट करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.——**या कलमातील "महा अधिवक्ता" या शब्दप्रयोगाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :——

(क्) सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधात, महा न्यायवादी किंवा सॉलिसिटर जनरल;

(ख्) उच्च न्यायालयाच्या संबंधात, ते उच्च न्यायालय ज्या राज्यासाठी किंवा राज्यांसाठी स्थापन करण्यात आले असेल त्यांपैकी कोणत्याही राज्याचा महा अधिवक्ता;

(ग्) न्याय आयुक्ताच्या न्यायालयाच्या संबंधात, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा विधि अधिकारी.

**१६.** (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, एखादा न्यायाधीश, दंडाधिकारी किंवा न्यायिक कार्य करणारी इतर व्यक्तीदेखील आपल्या स्वतःच्या न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही न्यायालयाच्या अवमानाबद्दल इतर कोणतीही व्यक्ती जशी दायी होते तशीच दायी होईल, आणि या अधिनियमाचे उपबंध तदनुसार, शक्य असेल तेथवर, लागू होतील. न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायिक कार्य करणाऱ्या इतर व्यक्तीने केलेला अवमान.

(२) एखाद्या न्यायाधीशाने, दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायिक कार्य करणाऱ्या इतर व्यक्तीने अशा न्यायाधीशासमोर, दंडाधिकाऱ्यासमोर किंवा इतर व्यक्तीसमोर प्रलंबित असलेल्या, दुय्यम न्यायालयाच्या आदेशावरील किंवा न्यायनिर्णयावरील एखाद्या अपिलात किंवा पुनरीक्षणात, त्या दुय्यम न्यायालयाच्या संबंधात व्यक्त केलेल्या कोणत्याही अभिप्रायास किंवा दिलेल्या शेऱ्यास या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**१७.** (१) कलम १५ खालील प्रत्येक कार्यवाहीची नोटीस, ज्या व्यक्तीवर दोषारोप ठेवण्यात आला असेल खुद्द त्या व्यक्तीवर बजावण्यात येईल,——मात्र काही कारणांस्तव न्यायालयाने अन्य निदेश दिला तर, ती कारणे नमूद करावी लागतील. दखल घेतल्यानंतरची कार्यपद्धती.

(२) (क्) एखाद्या चालना-अर्जावरून कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या चालना-अर्जाची प्रत, तसेच तो चालना-अर्ज ज्यांवर आधारलेला असेल असे काही प्रतिज्ञालेख असल्यास, त्यांच्या प्रती; व

---

१. १९७६चा अधिनियम ४५-कलम २ द्वारे घातले.

(ख) एखाद्या दुय्यम न्यायालयाने पाठवलेल्या निर्देशनावरून कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या निर्देशनपत्राची प्रत,

त्या नोटिशीसोबत जोडावी लागेल.

(३) जर कलम १५ खाली दोषारोप ठेवण्यात आलेली व्यक्ती ही नोटिशीची बजावणी टाळण्यासाठी फरारी होण्याची किंवा नजर चुकवून वावरण्याची शक्यता आहे याविषयी स्वत:ची खात्री झाली तर, न्यायालय स्वत:ला वाजवी वाटेल अशा मूल्याची किंवा रकमेची तिची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देऊ शकेल.

(४) पोटकलम (३) खालील प्रत्येक जप्ती ही 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली पैसे भरण्याच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना करावयाच्या मालमत्तेच्या जप्तीसाठी उपबंधित करण्यात आलेल्या पद्धतीने केली जाईल आणि अशा जप्तीनंतर जर दोषारोप ठेवण्यात आलेली व्यक्ती हजर झाली व नोटिशीची बजावणी टाळण्यासाठी आपण फरार झालो नव्हतो किंवा नजर चुकवून वावरत नव्हतो असे तिने न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने दाखवून दिले तर, न्यायालय खर्चाच्या संबंधात किंवा अन्यथा त्यास योग्य वाटतील अशा अटींवर त्या व्यक्तीची मालमत्ता जप्तीमधून मुक्त करण्याचा आदेश देईल.

(५) कलम १५ खाली दोषारोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीस स्वत:च्या बचावाच्या पुष्ट्यर्थ, प्रतिज्ञालेख दाखल करता येईल आणि न्यायालय एकतर दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञालेखांवरून किंवा आवश्यक असेल असा आणखी पुरावा घेतल्यानंतर, दोषारोपांच्या बाबींचा निकाल करू शकेल व त्या प्रकरणात न्याय करण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल असा आदेश देऊ शकेल.

फौजदारीपात्र अवमानांच्या प्रकरणांची सुनावणी न्यायपीठांनी करणे.

१८. (१) कलम १५ खालील फौजदारीपात्र अवमानांच्या प्रत्येक प्रकरणाची सुनावणी व निकाल किमान दोन न्यायाधीशांच्या न्यायपीठाकडून करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) हे न्याय आयुक्ताच्या न्यायालयाला लागू होणार नाही.

अपिले.

१९. अवमानाबदल शिक्षा देण्याच्या आपल्या अधिकारितेचा वापर करून उच्च न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध किंवा निकालाविरुद्ध अधिकारपूर्वक करावयाचे अपील—

(क) असा आदेश किंवा निकाल एकट्या न्यायाधीशाने दिलेला असेल त्याबाबतीत, न्याया-लयाच्या किमान दोन न्यायाधीशांच्या न्यायपीठाकडे;

(ख) असा आदेश किंवा निकाल न्यायपीठाने दिलेला असेल त्याबाबतीत, सर्वोच्च न्यायालयाकडे,

होऊ शकेल :

परंतु, असा आदेश किंवा निकाल कोणत्याही संघ राज्यक्षेत्रातील न्याय आयुक्ताच्या न्यायालयाने दिलेला असेल त्याबाबतीत, असे अपील सर्वोच्च न्यायालयाकडे होऊ शकेल.

(२) कोणतेही अपील प्रलंबित असेपर्यंत अपील न्यायालय असा आदेश देऊ शकेल की,—

(क) ज्या शिक्षेविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या शिक्षेची किंवा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करावी;

(ख) जर अपीलकर्ता बंदिवासात असेल तर, त्यास जामिनावर सोडावे; आणि

(ग) अपीलकर्त्याने स्वत: केलेल्या अवमानाचे परिमार्जन केलेले नसले तरी, त्याच्या अपिलाची सुनावणी करण्यात यावी.

(३) ज्याविरुद्ध अपील दाखल करता येते अशा आदेशामुळे नाराज झालेली कोणतीही व्यक्ती आपला अपील करण्याचा इरादा असल्याबद्दल उच्च न्यायालयाची खात्री करून देईल तेव्हासुद्धा उच्च न्यायालय पोटकलम (२) द्वारे त्यास देण्यात आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्तींचा वापर करू शकेल.

(४) पोटकलम (१) खाली करावयाचे अपील हे, ज्या आदेशाविरुद्ध ते असेल त्या आदेशाच्या दिनांकापासून,—

(क) उच्च न्यायालयाच्या एखाद्या न्यायपीठाकडे अपील करावयाचे असेल त्याबाबतीत, तीस दिवसांच्या आत ;

(ख) सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करावयाचे असेल त्याबाबतीत, साठ दिवसांच्या आत

दाखल करावे लागेल.

अवमानाबद्दल कारवाई करण्याची मुदतमर्यादा.

२०. अवमान ज्या दिनांकास झाल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, कोणतेही न्यायालय स्वत: होऊन किंवा अन्यथा अवमानाबद्दलची कार्यवाही सुरू करणार नाही.

२१. कोणत्याही कायद्यान्वये न्यायदानासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्याय पंचायती किंवा इतर ग्राम न्यायालये,—मग ती कोणत्याही नावाने ज्ञात असोत,—यांच्या अवमानाच्या संबंधात या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. न्याय पंचायती किंवा इतर ग्राम न्यायालये यांना हा अधिनियम लागू नसणे.

२२. या अधिनियमाचे उपबंध हे न्यायालयाच्या अवमानाशी संबंधित अशा अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधांव्यतिरिक्त असतील, त्यांस न्यूनकारी असणार नाहीत. हा अधिनियम अवमानाशी संबंधित अशा अन्य कायद्यांच्या व्यतिरिक्त आहे, त्यांस न्यूनकारी नाही.

२३. सर्वोच्च न्यायालयास किंवा, प्रकरणपरत्वे, कोणत्याही उच्च न्यायालयास त्याच्या कार्यपद्धतीशी संबंधित अशा कोणत्याही बाबीकरता उपबंध करणारे व या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे नियम करता येतील. सर्वोच्च न्यायालयाची व उच्च न्यायालयांची नियम करण्याची शक्ती.

२४. याद्वारे 'न्यायालय अवमान अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३२) हा निरसित करण्यात येत आहे. निरसन.

# THE CONTEMPT OF COURTS ACT, 1971

## न्यायालय अवमान अधिनियम, १९७१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| Bench | न्यायपीठ | .. | [S. 18 (1)] |
| civil contempt | दिवाणीपात्र अवमान | .. | [S. 2 (*b*)] |
| civil prison | दिवाणी कारागृह | .. | [S. 12 (3)] |
| contempt of court | न्यायालयाचा अवमान | .. | [S. 2 (*a*)] |
| criminal contempt | फौजदारीपात्र अवमान | .. | [S. 2 (*c*)] |
| determine the matter of the charge | दोषारोपाच्या बाबीचा निकाल करणे | .. | [S. 14 (1) (*c*)] |
| fair and accurate report | प्रामाणिक व बिनचूक प्रतिवृत्त | .. | [S. 4] |
| fair and accurate summary | प्रामाणिक व बिनचूक सारांश | .. | [S. 7 (2)] |
| fair comment | रास्त टीकाटिप्पणी | .. | [S. 5] |
| innocent publication | अनभिज्ञतेने प्रकाशित करणे | .. | [S. 3-m.n.] |
| in one's presence or hearing | –च्या देखत किंवा –ला ऐकू येईल अशा तऱ्हेने | | [S. 14 (1)] |
| interfere | हस्तक्षेप करणे | .. | [S. 2 (*c*) (*iii*)] |
| judicial act | न्यायिक कृती | .. | [S. 5] |
| judicial proceeding | न्यायिक कार्यवाही | .. | [S. 4] |
| keep out of the way | नजर चुकवून वावरणे | .. | [S. 17 (4)] |
| lower the authority of | –च्या अधिकाराला कमीपणा आणणे | .. | [S. 2 (*c*) (*i*)] |
| motion | चालना-अर्ज | .. | [S. 15 (1)] |
| obstruct | अटकाव करणे | .. | [S. 2 (*c*) (*iii*)] |
| revision | पुनरीक्षण | .. | [S. 3-expl. (*B*) (*ii*)] |
| scandalise | –चा बदलौकिक करणे | .. | [S. 2 (*c*) (*i*)] |
| sit in chambers or *in camera* | कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे बसून काम चालविणे | .. | [S. 7 (1) (*c*)] |

## न्यायालय अवमान अधिनियम, १९७१

## THE CONTEMPT OF COURTS ACT, 1971

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अटकाव करणे .. | obstruct .. | [S. 2 (*c*) (*iii*)] |
| अनभिज्ञतेने प्रकाशित करणे .. | innocent publication .. | [S. 3-m.n.] |
| कक्षांतर्गत किंवा जनान्तिकपणे बसून काम चालवणे | sit in chambers or *in camera* .. | [S. 7 (1) (*c*)] |
| –चा बदलौकिक करणे .. | scandalise .. | [S. 2 (*c*) (*i*)] |
| चालना-अर्ज .. | motion .. | [S. 15 (1)] |
| –च्या अधिकाराला कमीपणा आणणे | lower the authority of .. | [S. 2 (*c*) (*i*)] |
| –च्या देखत किंवा–ला ऐकू येईल अशा तऱ्हेने | in one's presence or hearing .. | [S. 14 (1)] |
| दिवाणी कारागृह .. | civil prison .. | [S. 12 (3)] |
| दिवाणीपात्र अवमान .. | civil contempt .. | [S. 2 (*b*)] |
| दोषारोपाच्या बाबीचा निकाल करणे | determine the matter of the charge | [S. 14 (1) (*c*)] |
| नजर चुकवून वावरणे .. | keep out of the way .. | [S. 17 (4)] |
| न्यायपीठ .. | Bench .. | [S. 18 (1)] |
| न्यायालयाचा अवमान .. | contempt of court .. | [S. 2 (*a*)] |
| न्यायिक कार्यवाही .. | judicial proceeding .. | [S. 4] |
| न्यायिक कृती .. | judicial act .. | [S. 5] |
| पुनरीक्षण .. | revision .. | [S. 3-expl. (*B*) (*ii*)] |
| प्रामाणिक व बिनचूक प्रतिवृत्त .. | fair and accurate report .. | [S. 4] |
| प्रामाणिक व बिनचूक सारांश .. | fair and accurate summary .. | [S. 7 (2)] |
| फौजदारीपात्र अवमान .. | criminal contempt .. | [S. 2 (*c*)] |
| रास्त टीकाटिप्पणी .. | fair comment .. | [S. 5] |
| हस्तक्षेप करणे .. | interfere .. | [S. 2 (*c*) (*iii*)] |

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

● **संचालक**
मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
महाराष्ट्र राज्य
नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४००००४
दूरध्वनी : ३५५१८१

● **पर्यवेक्षक**
शासकीय ग्रंथागार
(केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रकाशनाकरिता)
(फक्त स्थानिक विक्रीकरिता)
युसुफ बिल्डिंग, दुसरा मजला, खो. नं. २१
वीर नरीमन रोड (हुतात्मा चौकाजवळ)
मुंबई ४०० ००१
दूरध्वनी : २९७५९४

● **पर्यवेक्षक**
शासकीय ग्रंथागार
बडबे बिल्डिंग, भंडारकर इन्स्टिटयूट मार्ग
पी.वाय.सी. जिमखान्याजवळ पुणे ४११ ००४
दूरध्वनी : ५६७५९

● **व्यवस्थापक**
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दूरध्वनी : २२६१५

● **पर्यवेक्षक**
शासकीय ग्रंथागार
शहागंज, गांधी चौकाजवळ
औरंगाबाद ४३१ ००१
दूरध्वनी : २५२५
आणि
महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते